sem IV SYBA Marathi P. II

NO3AAX

March - 2015

वेळ : २ १/२ तास गुण : ७५

प्र. १ 'प्रवासवर्णन हा विमुक्त, लवचिक आणि मोकळा वाङ्‌मय प्रकार आहे' साधार चर्चा करा. (१५)

**किंवा**

'प्रवासात आलेल्या अनुभवाची संवेदनशील मनाने टिपलेली तरल स्पंदने म्हणजे प्रवासवर्णन होय.' सोदाहरण स्पष्ट करा.

प्र.२ सूक्ष्म निरीक्षण आणि चित्रदर्शी शैली यामुळे 'तोकोनोमा' हे प्रवासवर्णन वाचकांच्या मनाची पकड घेते." साधार भाष्य करा. (१५)

**किंवा**

"प्रसंग वर्णन कौशल्य आणि व्यक्ती रेखाटन कौशल्य यामुळे 'तोकोनोमा' या प्रवासवर्णनात जिवंतपणा आला आहे." या विधानाचा साधार परामर्श घ्या.

प्र. ३ "घाट शिळेवरी उभी' या प्रवासवर्णनातून रा. भि. जोशी भारतीय संस्कृतीचे दर्शन घडवितात" सोदाहरण चर्चा करा. (१५)

**किंवा**

रा. भि. जोशी यांच्या प्रवासलेखनाची वैशिष्ट्ये "घाट शिळेवरी उभी" या प्रवासवर्णनाच्या आधारे सोदाहरण लिहा.

प्र. ४ टीपा लिहा. (१५)

(अ) प्रवासवर्णनातील शैलीचे महत्व

**किंवा**

प्रवासवर्णनातील स्थल दर्शन

(आ) 'अतामी' मधील 'प्रेमाचा सैतान'

**किंवा**

'चंद्रोत्सव' मधील कलासंवेदना

(इ) 'पुढची मजल' मधील लेखकाचा प्रवास

**किंवा**

'वेरुळच्या वाटेने' मधील शिल्पकला सौंदर्य

मागे पहा.....

Sem IV SYBA Marathi P. II
March - 2018

NO3AAX

प्र. ५ अ) कोणत्याही **पाच** प्रश्नांची **एका** वाक्यात उत्तरे लिहा. (१०)

१) 'प्रेमाचा सैतान' हे कोणत्या देशातील कादंबरीचे नाव आहे?
२) जपानमध्ये इहलोकीची अप्सरा कुणाला म्हणतात?
३) जपानी लोक भेट देण्यासाठी काय शोधत असतात?
४) गेशा सभोवतालच्या वातावरणात कशाचे अमृत ओतते?
५) अहमदनगरच्या निजामशाहीचा शेवटचा थोर सेनापती कोण?
६) अजिंठ्याला किती लेण्यांचा समुह आहे?
७) गोवा राज्याचे राजचिन्ह काय आहे?
८) ठाणे शहराचे प्राचीन नाव काय आहे?

प्र. ५ ब) पुढील बहुपर्यायांपैकी **योग्य** पर्याय निवडा. (५)

१) प्रवासलेखनात लेखक त्या - त्या स्थळांचा काय उभा करत असतो?
अ) परिसर ब) समाज क) इतिहास

२) प्रवासवर्णन हा कसा वाङ मय प्रकार आहे?
अ) बांधेसूद मी ब) लवचिक क) बंदिस्त

३) प्रवासात विविध देशातील कोण भेटतात?
अ) शहरे ब) समुद्र क) माणसे

४) प्रवासवर्णनात वारंवार काय येत असते?
अ) मी ब) तू क) ते

५) मराठी भाषेतील पहिले प्रवासवर्णन कोणते?
अ) माझा प्रवास ब) तोकोनोमा क) घाटशिळेवरि उभी